REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास - विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा

डॉ. रामेश्वर एम. मोरे
समाजशास्त्र विभाग , संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप.
ता.द. सोलापूर, जि. सोलापूर.

## प्रस्तावना :-



भारतात १९९७ ते २०१२ या कालावधीत २,६०,२४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. भारतातील शेतकरी आत्महत्यात सर्वाधिक आत्महत्या या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केल्या आहेत. महाराष्ट्रात १९९७ ते २०१२ या कालावधीत ५४,५४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. देशातील एकूण शेतकरी आत्महत्यात हे प्रमाण २०.९५% इतके सर्वाधिक आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या या विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी केल्या आहेत. मराठवाड्यात बीड, नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. सद्यस्थितीतही उस्मानाबाद जिल्ह्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत. कृषीप्रधान देशात एवढ्या मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. म्हणून शेतकरी आत्महत्यांचे प्रदेशनिहाय सखोल अध्ययन करुन ही समस्या सोडविणे गरजेचे आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी "आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास" - विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा असा विषय निवडला आहे व त्याद्वारे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्यांची कारणे व आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या सद्यस्थितीचे सखोल अध्ययन करुन निष्कर्ष मांडले आहेत. तसेच आवश्यक त्या शिफारशी केल्या आहेत.

## संशोधन पध्दती-

प्रस्तुत शोधनिबंधात आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी नमुना निवड पध्दतीतील साधा यादृच्छिक नमुना निवडीव्दारे उस्मानाबाद जिल्हयातील आत्महत्या केलेल्या १०० शेतक-यांच्या कुटुंबांची निवड करुन अनुसुची व निरीक्षण तंत्राच्या माध्यमातून प्राथमिक तथ्यांचे सकंलन करण्यात आले. दुय्यम तथ्यांसाठी संदर्भ ग्रंथ,मासिके,संशोधन अहवाल इत्यांदीचा आधार घेतला. संकलित तथ्यांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करुन निष्कर्ष मांडले आहेत.

## संशोधनातील प्रमुख निष्कर्ष

(१) कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी पार पाडणाऱ्या ३६ ते ४५ या वयोगटातील सर्वाधिक म्हणजेच ३६% शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्याखालोखाल ४६ ते ५९ या वयोगटातील ३३% शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर १८ ते २५ या वयोगटातील ०३%, २६ ते ३५ या वयोगटातील १३% व ६० वर्षे व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या १५% शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

(२) बहुतांश निरक्षर आणि प्राथमिक व माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतलेले शेतकरी प्रामुख्याने परंपरागत पद्धतीने शेती करतात तसेच खोट्या जाहिरातीला बळी पडतात. परिणामी उत्पन्नात घट होऊन दारिद्र्य व कर्जबाजारीपणात वाढ होते. त्यामुळे शेवटी ते आत्महत्येचा मार्ग अवलंबतात. म्हणून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यात सर्वाधिक म्हणजेच ४०% आत्महत्या या निरक्षर शेतकऱ्यांच्या आहेत. त्याखालोखाल प्राथमिक १९% व माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेतलेल्या २७% शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या १०% व पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या ४% शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. विशेष बाब ही की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यात पदव्युत्तर शिक्षण घेतलेला एकही शेतकरी नव्हता.

(३) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबात ७३% विभक्त कुटुंब आहेत तर २३% संयुक्त कुटुंब आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, संयुक्त कुटुंबापेक्षा विभक्त कुटुंबात राहणाऱ्या शेतकऱ्यांत आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. मार्गदर्शनाचा अभाव, भावनिक व मानसिक आधाराचा अभाव, कौटुंबिक वाद इतर विविध कारणांमुळे विभक्त कुटुंबात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

(४) उस्मानाबाद जिल्ह्यात मराठा जात ही प्रभावी जात आहे. परंतु सद्यस्थितीत मराठा जातीत विभक्त कुटुंबाच्या वाढत्या प्रमाणामुळे जमीनीचे विभाजन झाल्यामुळे शेतीक्षेत्र कमी झाले. त्यामुळे उत्पन्नही कमी झाले. परंतु प्रतिष्ठेवर होणारा खर्च तसेच इतर खर्च फारसा कमी झाला नाही. त्यामुळे खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी स्थिती झाली. परिणामी दारिद्र्य व कर्जबाजारीपणात वाढ झाली व प्रतिष्ठा देखील कमी झाली. या सर्वांचा परिणामी बहुतांश शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग अवलंबला आहे. म्हणून जिल्ह्यातील एकूण शेतकरी आत्महत्यात मराठा जातीतील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण ६०% इतके आहे. त्या खालोखाल लिंगायत व धनगर जातीच्या प्रत्येकी ११% शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर माळी ६%, महार ३%, मुसलमान व वंजारी प्रत्येकी २% व न्हावी, लमाण, सोनार, वडार, कुंभार जातीच्या प्रत्येकी १% शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे.

(५) आत्महत्येपुर्वी बहुतांश शेतकरी कुटुंब दारिद्र्यात जीवन जगत होती. त्यामुळे बहुतांश कुटुंबात सातत्याने आर्थिक प्रश्न निर्माण होऊन वाद होत होते. तर कांही कुटुंबात व्यसनामुळे, पती-पत्नीतील अविश्वासामुळे वाद होत होते. हे वाद संयुक्त कुटुंबापेक्षा विभक्त कुटुंबात अधिक होत होते. हे कौटुंबिक वाद देखील कांही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी जबाबदार ठरले आहेत.

(६) आत्महत्या केलेल्या ७% शेतकरी कुटुंबाचे शेजाऱ्यांशी शेतीची वाटणी, शेतीसाठीचे रस्ते व इतर कारणास्तव दिर्घकाळ वाद होते. हे वाद देखील काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी जबाबदार ठरले आहेत.

(७) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी ९% शेतकरी हे स्वतः गंभीर आजारी होते. तर ६% कुटुंबात इतर लोक गंभीर आजारी होते. हे आजारपण व आजारपणावर होत असलेला खर्च देखील कांही शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरला आहे.

(८) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी ४७% शेतकऱ्यांना प्रामुख्याने मद्यपानाचे व्यसन होते. हे व्यसन प्रामुख्याने दारिद्र्य, कर्जबाजारीपणा व कौटुंबिक वाद इत्यादी कारणांमुळे लागले होते. हे व्यसन देखील कांही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरले आहे. परंतु येथे हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, केवळ मद्यपानाच्या व्यसनामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत तर त्यास इतर घटक देखील जबाबदार आहेत.

(९) आत्महत्या केलेल्या बहुतांश शेतकरी कुटुंबांना आत्महत्येपूर्वी दारिद्र्य, मद्यपानाचे व्यसन, पत्नीचा बाहेरख्यालीपणा, एड्सचा आजार इ. कारणांमुळे मानसन्मान, प्रतिष्ठा मिळत नव्हती. तसेच अनेकवेळा अपमान देखील होत होता. प्रतिष्ठेचा ऱ्हास तसेच वारंवार होणारा अपमान देखील कांही शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरला आहे.

(१०) आत्महत्या केलेल्या २६% शेतकरी कुटुंबात आत्महत्येपूर्वी दोन-तीन वर्षात मुलांमुलींचे विवाह झाले होते व या विवाहावर साधारणपणे १ लाखापासून ते ४ लाखापेक्षा जास्त खर्च केला होता. हा खर्च प्रामुख्याने कर्ज काढून करण्यात आला होता. त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढला होता. हा वाढलेला कर्जबाजारीपणा देखील कांही प्रमाणात शेतकरी आत्महत्येस जबाबदार ठरला आहे.

(११) निवडणुकीत अत्यंत विश्वासू व्यक्तीने दिलेला धोका, निवडणुकीतील अपयश, निवडणुकीच्या खर्चामुळे वाढलेला कर्जबाजारीपणा व त्या ताणतणावातून लागलेले व्यसन इ. घटक ४% शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभुत ठरले आहेत.

(१२) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबात अत्यल्प भुधारक (२.५ एकरपेक्षा कमी), अल्पभुधारक (२.५ ते ५ एकर) व लहान शेतकऱ्यांचे (५ ते १० एकर) प्रमाण जास्त आहे. तर मध्यम (१० ते २० एकर) व मोठ्या शेतकऱ्यांचे (२० एकर पेक्षा जास्त) प्रमाण अत्यंत कमी आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, शेतीक्षेत्र कमी असल्यामुळे उत्पन्न देखील कमी व त्या उत्पन्नातून किमान खर्च देखील भागत नसल्यामुळे अनेक संकटांना तोंड देऊन नैराश्यामुळे १० एकर पर्यंत शेती असणाऱ्या सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामध्ये २५% अत्यल्पभुधारक, ४०% अल्पभुधारक व १९% लहान शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तसेच काही मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांनी देखील आत्महत्या केल्या आहेत. त्यांचे एकूण आत्महत्येत प्रमाण प्रत्येकी ६% इतके होते. त्याचबरोबर ०४% भूमीहीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

(१३) आत्महत्या केलेल्या ४८% शेतकरी कुटुंबाची शेती कोरडवाहु आहे तर ४१% कुटुंबांची शेती मिश्र आहे व केवळ ०७% कुटुंबाची शेती बागायती आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, शेतकरी आत्महत्यात सर्वाधिक आत्महत्या या कोरडवाहु शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. त्याखालोखाल मिश्र शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या आहेत. तर अल्प प्रमाणात बागायती शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी देखील आत्महत्या केल्या आहेत.

(१४) आत्महत्या केलेल्या ५५% शेतकरी कुटुंबाच्या शेतीत सोयाबीन हे मुख्य पीक असते तर १६% कुटुंबाच्या शेतीत ज्वारी, ०८% कुटुंबांच्या शेतीत ऊस, ७% कुटुंबांच्या शेतीत कापूस व प्रत्येकी ५% कुटुंबाच्या शेतीत मका व तूर हे मुख्य पिक असते. यावरुन हे स्पष्ट होते की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यात प्रामुख्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचे प्रमुख कारण असे की, सद्यस्थितीत सोयाबिनचा उत्पादन खर्च खूप वाढला आहे. त्या तुलनेत त्याचे भाव वाढले नाहीत. तसेच एकरी उतारा ही घटला आहे. त्यामुळे उत्पादन खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी अवस्था झाली आहे.

(१५) शेतीमालाची आधारभूत किंमत ठरवण्याची चुकीची पद्धत, शासनाचे अयोग्य आयात- निर्यात धोरण व व्यापाऱ्यांच्या शोषणाच्या नीतीमुळे शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळत नाही. शेतीमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यात नैराश्य निर्माण होते. या नैराश्यातून शेतकरी आत्महत्या करतात. याचाच अर्थ, शेतीमालाच्या भावा संदर्भातील अयोग्य शासकीय धोरणे शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरतात.

(१६)निसर्गाने साथ दिली तर साधारणपणे शेतीत जेवढा उत्पादन खर्च केला त्याच्या सरासरी दुप्पट उत्पन्न मिळते परंतु निसर्गाने साथ दिली नाही तर उत्पादन खर्च देखील निघत नाही. बहुतांश वेळा निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पादन खर्च ही निघत नाही. त्यामुळेच शेतकरी दारिद्र्य व कर्जबाजारीपणाच्या चक्रव्यूहात अडकलेला आहे.

(१७) आत्महत्या केलेल्या ८२% शेतकरी कुटुंबात कोणताही पुरक व्यवसाय केला जात नाही. त्यामुळे शेतीने साथ दिली नाही तर अनेक आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते. अशा संकटाचा सामना करणे ज्यावेळी अशक्य होते तेंव्हा शेतकरी आत्महत्येचा मार्ग अवलंबतात. म्हणजेच पूरक व्यवसाय नसल्यामुळे देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होते.

(१८) आत्महत्या केलेल्या ९३% शेतकरी कुटुंबावर आत्महत्येपूर्वी कर्ज होते. विशेषतः मराठा जातीतील कुटुंबावर अधिक कर्ज होते. हे कर्ज प्रामुख्याने शेती खर्च, घरखर्च, मुलीचा विवाह व मुलांचे शिक्षण इत्यादी कारणांसाठी घेतले होते. हे कर्ज देखील कांही प्रमाणात शेतकरी आत्महत्येस जबाबदार ठरले आहे.

(१९)शेतकऱ्यांच्या आत्महत्यासाठी प्रामुख्याने कोणताही एक घटक जबाबदार नाही तर प्रत्येक शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कमीत कमी दोन व जास्तीत जास्त चार घटक जबाबदार ठरले आहेत. दारिद्र्य ७७%, कर्जबाजारीपणा ७४%, मद्यपानाचे व्यसन २८%, अत्यल्प उत्पादन व उत्पादनाला मिळणारा कमी भाव २३%, नापिकी २२%, कौटुंबिक वाद १९%, प्रतिष्ठेचा ऱ्हास ११%, आजारपण व आजारपणावरील खर्च ०७%, शेतीसंबंधीचे व इतर वाद ०७%, मुलीच्या अथवा बहिणीच्या लग्नाची चिंता ०६%, कौटुंबिक चिंता ०६%, राजकारणातील सक्रीय सहभाग ०४% व इतर व्यवसायातील अपयश ०३% इत्यादी प्रमुख घटक शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरले आहेत. या प्रमुख घटकांसोबतच सामाजिक एकता व सहकार्याचा अभाव हे घटक सर्वच शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कमी-अधिक प्रमाणात जबाबदार ठरले आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्यासाठी प्रामुख्याने दारिद्र्य व कर्जबाजारीपणा हे घटक जबाबदार ठरले आहेत. तसेच मद्यपानाचे व्यसन, नापिकी, अत्यल्प उत्पादन व उत्पादनाला मिळणारा कमी भाव व कौटुंबिक वाद इत्यादी घटक देखील बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरले आहेत. तर काही शेतकऱ्यांच्या आत्महत्येस प्रतिष्ठेचा ऱ्हास, आजारपण व आजारपणावरील खर्च, शेतीसंबंधीचे व इतर वाद, मुलीच्या अथवा बहिणीच्या लग्नाची चिंता, कौटुंबिक चिंता, इतर व्यवसायातील अपयश व राजकारणातील सक्रीय सहभाग इत्यादी घटक जबाबदार ठरले आहेत.

**शिफारशी:-**

(१) शेतकरी आत्महत्यांचे मूळ दारिद्र्यात आहे त्यामुळे शेतकऱ्यांना दारिद्र्यातून मुक्त करणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या किमान अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागतील अशी व्यवस्था करावी. त्यासाठी (I) स्वस्त धान्य दुकानातून गहु, तांदूळ, साखर, तेल व डाळी इत्यादी प्रमुख वस्तू दर्जेदार व कमी दराने पुरेशा प्रमाणात द्याव्यात. (II) शेतकऱ्यांना घर बांधकामासाठी काही प्रमाणात आर्थिक मदत करून निवाऱ्याचा प्रश्न सोडवावा.

(२) कर्जबाजारीपणा हा घटक देखील बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरला आहे त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणातून सुटका करणे गरजेचे आहे त्यासाठी (I) शेतकऱ्याची लुट करणाऱ्या सावकारावर तसेच छुप्या पद्धतीने अधिक व्याजाने कर्ज देणाऱ्या नातेवाईकांवर कडक कारवाई करावी. (II) शासनाने अत्यल्पभुधारक, अल्पभुधारक, लहान, मध्यम व मोठ्या अशा सर्वच शेतकऱ्यांचे जुने संपूर्ण कर्ज माफ करून सातबारा कोरा करावा. (III) शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकाद्वारे अतिशय अल्प व्याजदराने शेतीखर्च, मुलीचे विवाह, मुलाचे शिक्षण, घर बांधकाम, आजारपण इत्यादीसाठी त्वरीत कर्जपुरवठा करावा आणि त्या कर्जाच्या वसुलीचे हप्ते मार्च-एप्रिल महिन्यात ठेवावे. जेणेकरून शेतकरी आपला शेतीमाल विकून कर्जाचा हप्ता भरतील.

(३) शासनाचे अयोग्य कृषी धोरण देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार ठरत आहे. त्यामुळे शासनाच्या कृषी धोरणात पुढील बदल करणे गरजेचे आहे. (I) शेतीक्षेत्रातील गुंतवणुकीत व अनुदानात वाढ करावी. (II) शेतकऱ्याचे निव्वळ उत्पन्न वाढेल असे उत्पन्न धोरण करावे. (III) उत्पादन खर्चावर आधारित पिकांची किमान आधारभूत किंमत योग्य ठरवावी. (IV) शेतीमालाचे भाव वाढल्यास त्वरीत परदेशातून शेतीमाल आयात करू नये. परदेशातून येणाऱ्या शेतीमालावर आयात कर वाढवावा व शेतकऱ्यांना शेतीमाल निर्यातीस मदत करावी.

(४) शेतकऱ्यांना दारिद्र्य व कर्जबाजारीपणातून मुक्त करण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य हमी भाव द्यावा. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य हमी भाव दिल्यास शेतकऱ्यांना शासनाकडे कोणत्याही बाबतीत हात पसरावे लागणार नाहीत. शेतकरी समाधानाने जीवन जगतील.

(५) शासकीय मदतीच्या निकषांची व्याप्ती वाढवून प्रामुख्याने दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या व सावकार, नातेवाईक आणि बँकेचे चालू कर्जदार असणाऱ्या सर्वच आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना ५ लाख रु. इतकी आर्थिक मदत करावी.

(६) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाचा खर्च शासनाने करावा.

(७) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील एका व्यक्तीस त्याच्या पात्रतेनुसार नोकरी द्यावी, अथवा इतर पूरक व्यवसाय करण्यास आर्थिक मदत करावी.

(८) सद्यस्थितीत बहुतांश शेतकऱ्याकडे शेतीक्षेत्र कमी असल्यामुळे त्यातून उदरनिर्वाहाचा खर्च भागवणे देखील अवघड झाले आहे. त्यातच निसर्गाने साथ दिली नाही तर शेतकऱ्यांची अवस्था अधिक बिकट होते म्हणून कुक्कुटपालन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, इत्यादी विविध पूरक व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करून आर्थिक मदत करावी.

(९) जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांची शेती कोरडवाहु असल्यामुळे उत्पन्न कमी आहे म्हणून शासनाने शेततळी, बंधारे, पाझर तलाव, मोठे तलावाची संख्या वाढवून सिंचन सुविधा द्यावी तसेच शेतकऱ्यांना केल्या जाणाऱ्या विज पुरवठ्यात कपात करू नये.

(१०) शेतकऱ्यांना शेतीक्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देऊन आधुनिक पद्धतीने शेती करण्यास प्रोत्साहीत करावे. तसेच त्यासाठी काही प्रमाणात आर्थिक मदत देखील करावी.

(११) शेतकऱ्याचे शेती उत्पादन वाढण्यासाठी गावपातळीवर कृषी तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात यावे. विशेषतः जिल्ह्यात सोयाबीन उत्पादक शेतकरी जास्त आहेत त्यामुळे सोयाबीन पीकासंबंधी विशेष मार्गदर्शन करावे.

(१२) आजही शेतकरी कुटुंबात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे तर नोकरदारांचे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणून शासनाने शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी सोयी-सवलती द्याव्यात तसेच नोकऱ्यात आरक्षण द्यावे.

## संदर्भ :-


१) डरखिम एमिल (१८९७), आत्महत्या समाजशास्त्रीय अध्ययन, अनुवादक- रामकिशन गुप्त (२००८), ग्रंथ शिल्पी (इंडिया) प्राईवेट लिमिटेड, दिल्ली.

२) ढोबळे विष्णू (२००९), शेतकऱ्यांच्या आत्महत्या- जागतिकीकरणातील शोकांतिका, सुगावा प्रकाशन, पुणे.

३) नाईकवाडे अशोक (संपादक) (२००८), शेतकऱ्यांच्या आत्महत्या- चिंता आणि चिंतन, कीर्ति प्रकाशन, औरंगाबाद.

४) बोकरे दिवाकर (२००८), शेतकऱ्यांच्या आत्महत्या.... थांबवायच्या कशा?, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

५) लांजेवार नरेंद्र (संपादक) (२००७), शेतकऱ्यांच्या आत्महत्या- चिंतन आणि उपाय, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली.

६) वानखडे चंद्रकांत (२००७)- एका साध्या सत्यासाठी, परिसर प्रकाशन, अंबाजोगाई.

७) आगलावे प्रदिप (२०००), संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

८) भांडारकर पु.ल. (१९७६), सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, दत्तसन प्रकाशन, नागपूर.

९) Durkhiem Emile (१८९७), Suicide A study in Sociology, Translated by John A. S. Paulding and George Simpson (१९६८)] Routledge S. Kegan Paul Ltd., London Ec. ४.

१०) Goode William J. and Hatt Paul K. (१९५२), Methods in Social Research, McGRAW-HILL BOOK COMPANY, INC. TOKYO.

११)Gyanmudra (Editor) (२००७), Farmers Suicide in India, Dynamics and Strategies of Prevention, Deep & Deep Publication Pvt. Ltd., New Delhi.

१२) Talule Dnyandev (२०१२), Poor farm Economy (Micro Level Dimensions of Farmers Suicides in Maharashtra), Sahity Manthan, Kanpur.

१३) जाधव नरेंद्र (२००८)- शेतकरी आत्महत्या आणि कृषीक्षेत्रापुढील आव्हाने : कर्जमाफी आणि समग्र महाराष्ट्र समतोल कृषीविकास कृतीयोजना अहवाल, २७ जुलै २००८.

१४) Dandekar Ajay and other (२००५), Causes of Farmers Suicides in Maharashtra : An Enquiry, www.academia.edu/.../causes_of farmer_suicides_in_maharashtra_AN

१५) Mishra Srijit (२००६), Suicide of Farmers in Maharashtra, www.igidr.ac.in/conf/suicide/finalreport_SFM_IGIDR_२६Jan०६.pdf